# गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोली.

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७)विशी–४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५) चा कलम ३ च्या पोटकलम(२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम,२०१६(सन्न २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

**( विद्या विभाग )**

**एम. आय. डी. सी. रोड कॉम्प्लेक्स गडचिरोली –४४२६०५ (विद्या) फोन नंबर ७१३२. २२३३२३**


गोविग/विद्या/क/३०३/२० दि. २५/०९/२०२०

## <u>अधिसूचना</u>

सर्व संबंधिताच्या माहिती करिता सुचित करण्यात येते की, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली या विद्यापीठाद्वारे निर्गमित अधिसूचना क्र./गोविग/विद्या/अर्क./५३/२० दिनांक १५/०७/२०२० नुसार संचालित महाविद्यालय, शैक्षणिक विभाग व संलग्नित महाविद्यालयात सुरू असलेल्या विविध अभ्यासक्रमात प्रवेश घेण्याची अंतीम तिथी दिनांक ३१/०८/२०२० होती.

परंतु काही अपरिहार्य कारणास्तव जे काही विद्यार्थी विहीत तारखेपर्यंत महाविद्यालयात प्रवेश घेऊ शकले नाही व विद्यापीठ कार्यक्षेत्रातील एकही विद्यार्थी प्रवेशापासून वंचित राहू नये यासाठी सर्व प्रवेश पात्र विद्यार्थ्यांना मा.कुलगुरूंच्या परवानगीने दिनांक २५/०९/२०२० पर्यंत महाविद्यालयात प्रवेश घेण्यासाठी मुदत वाढ देण्यात आलेली होती.

तथापी विद्यापीठाशी संलग्नित बऱ्याच महाविद्यालयांच्या विनंतीनुसार विद्यार्थी प्रवेशापासून वंचित राहू नये म्हणून मा.कुलगुरू महोदयांनी दिलेल्या मान्यतेनुसार पदवी अभ्यासक्रमांसाठी दि. १५ आक्टोंबर,२०२० आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी दि. ३० ऑक्टोंबर, २०२० पर्यंत महाविद्यालयात/विद्यापीठाच्या पदव्युत्तर शैक्षणिक विभागामध्ये प्रवेश घेण्यासाठी मुदत वाढ देण्यात येत आहे.

सदर मुदतवाढ ज्या अभ्यासक्रमाचे प्रवेश केंद्रीय प्रवेश समितीद्वारे केले जातात त्यांना लागू राहणार नाही. निर्धारित प्रवेश क्षमतेमध्ये रिक्त जागी प्रवेश देण्यासाठी ही मुदतवाढ देण्यात येत आहे, याची नोंद घ्यावी.

**मा.कुलगुरूंच्या आदेशान्वये,**

(डॉ.ईश्वर मोहुर्ले)
कुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**प्रतिलिपी माहितीस्तव व पुढील कार्यवाहीस्तव अग्रेषित:—**

१. मा.कुलगुरूंचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
२. मा.प्र—कुलगुरूंचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
३. मा.संचालक, परिक्षा व मुल्यमापन मंडळ, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
४. मा.वित्त व लेखा अधिकारी, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
५. मा.प्राचार्य, सर्व संलग्नित व संचालित महाविद्यालये, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
६. मा.विभाग प्रमुख सर्व पदव्युत्तर शैक्षणिक विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
७. सर्व अधिकारी, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.